सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४७ | मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
११ नोव्हेंबर

- अल्बर्ट आइन्स्टाईन आणि लिओ झिझार्ड यांना आइन्स्टाईन रेफ्रिजरेटरच्या शोधासाठी पेटंट देण्यात आले.
- पंढरपूरचे विठ्ठल मंदिर लोकांसाठी खुले करण्यात आले.

# कुंभमेळ्यासाठी जळगाव- नाशिक विमानसेवेसाठी हालचाली!



## पाच तासांचा प्रवास एकाच तासात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांना जलद प्रवासासाठी जळगाव ते नाशिक दरम्यान विमानसेवा सुरू करण्यासाठी हालचाली सुरू आहेत. यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. पाच तासांचा प्रवास विमानसेवेमुळे एकच तासात होणार आहे. यामुळे धार्मिक पर्यटनाला चालना मिळणार आहे.

जळगाव व नाशिक येथील दोन्ही विमानतळ कार्यरत आहेत. यामुळे ही विमानसेवा तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. सध्या प्राथमिक स्तरावर यासंदर्भात हालचाली सुरू आहेत. जिल्ह्यातील मंत्री तसेच लोकप्रतिनिधींनी नागरी उड्डाण मंत्रालय तसेच विमान कंपनीकडे पाठपुरावा केल्यास ही सेवा कुंभमेळ्यात प्रत्यक्षात उतरू शकते, अशी विश्वसनीय माहिती समोर येत आहे. याबाबत प्रशासकीय स्तरावर देखील ही विमान सेवा सुरू करण्याबाबत पडताळणी होणार असल्याची शक्यता आहे. भाविकांच्या सोयीसाठी आणि धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

कुंभमेळा हे धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे व लाखो भाविकांचे आकर्षण असते. त्यामुळे या काळात विमानसेवा सुरू झाल्यास जळगाव येथून अथवा अन्य जवळच्या ठिकाणांवरून भाविकांना दळणवळणाचे जलद होईल. केवळ धार्मिक पर्यटनालाच चालना मिळणार नाही, तर दोन्ही जिल्ह्यांमधील अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# भोरटेक रेल्वे गेटजवळील रस्ता ठरतोय मृत्यूचा सापळा!

### डांबर उखडले, रस्त्यामधून सळया आल्या बाहेर, अपघाताचा धोका

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील भोरटेक रेल्वे गेट जवळील रस्त्याची अवस्था दयनीय झाली आहे. वळणावरील काँक्रिट रस्त्याला तडे पडलेले आहेत. त्यातून लोखंडी सळया बाहेर आल्या आहेत. रस्त्याचे डांबरही उखडले आहे. यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा ठरत आहे. मोठ्या अपघातांचा धोकाही वाढला आहे. याकडे बांधकाम विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांसह परिसरातील नागरिकांनी केली आहे.

अमळनेर- शिंदखेडा या राज्य मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यावरुन रोज हजारो प्रवाशांचा अहोरात्र वापर आहे. मात्र, ठिकठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यांना तडे जाऊन रस्त्यात अंतर पडले आहे. हा रस्ता नरडाणा पाणून राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रस्ता आहे. भोरटेक रेल्वे गेटजवळ हा रस्ता अत्यंत अरुंद आहे. एका बाजूला रेल्वेचे कुंपण केले आहे. दुसऱ्या बाजूला असलेला हा रस्ता धोकेदायक बनला आहे. गेवर मधोमध रस्त्याला मोठे तडे पडले आहे. वाहनचालकांना बाहेर निघालेली सळी व पडलेले खड्डे टाळावे लागतात. गेटवरुन जीवघेणा प्रवास करावा लागतो. सळई वाहनांच्या चाकात घुसली तर टायर फुटण्याची शक्यता असते. गेटमधील रस्ता अरुंद असल्याने एकाच रांगेत वाहने काढावी लागतात. वळण रस्त्याबाबत दिशादर्शक फलकही येथे लावण्यात आलेला नाही. परिणामी वाहनचालकांना याचा अंदाज येत नाही.



(छायाचित्र : विशाल पाटील)

### बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

अमळनेर- नरडाणा रस्ता हा बांधकाम विभागाच्या अख्यारीत येतो. या रस्त्यावर रोज मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. हा रस्ता पूर्वी दर्जेदार रस्ता म्हणून ओळखला जात होता. मात्र, मोठ्या प्रमाणात होत असलेल्या अजवड वाहनांच्या वर्दळीने रस्ता पूर्णतः खराब झाला आहे. याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.

## अमळनेरसह परिसरात शेकोट्या पेटू लागल्या!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून थंडीचा आता जोर वाढला आहे. सकाळी व रात्रीच्या थंडीने अंग गोठू लागले आहे. नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी शेकोट्या पेटवण्यास सुरुवात केली आहे. शहरातील चौकाचौकात, रस्त्याच्या कडेला व ग्रामीण भागातही लोक शेकोटीभोवती ऊब घेताना दिसत आहेत. दिवसा वेळी ऊन असले तरी पहाटे दाट धुके व गार वारे वाहत आहेत. तापमानातील घसरणीमुळे बाजारपेठेत उबदार कपड्यांना मागणी वाढली आहे. चहाची ठिकाणेही गर्दीने फुलू लागली आहेत. पुढील काही दिवस अजून कडाक्याची थंडी वाढण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

# आमदार अनिलदादा पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्तेपदी नियुक्ती

### जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रात कार्यकर्त्यांमध्ये आनंदोत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- माजी मदत व पुनर्वसन मंत्री, नंदुरबारचे माजी पालकमंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्तेपदी नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीमुळे जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रात कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

आमदार अनिलदादा पाटील यांच्या नियुक्तीमुळे पक्षाला एक अनुभवी, संयमी, शांत स्वभावाचे आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे. त्यांच्या कुशल नेतृत्वामुळे आणि जनतेशी त्यांची नाळ जुळली असल्याने पक्षाच्या संघटनात्मक बळकटीला नवी दिशा व ऊर्जा मिळेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला आहे.

आमदार अनिलदादा पाटील यांनी दीर्घ राजकीय कारकिर्दीत ग्रामीण भागातील विकास, शेती, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व रोजगार निर्मितीवर विशेष भर दिला आहे. नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी आदिवासी भागाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविल्या आहेत. मंत्रीपदाच्या काळात त्यांनी आपत्तीग्रस्तांना मदत, पुनर्वसन आणि जनहिताच्या धोरणात्मक निर्णयातून कार्यक्षम प्रशासनाचे उदाहरण घालून दिले आहे. त्यांच्या प्रामाणिक, लोकाभिमुख कार्यपद्धतीची दखल घेऊन पक्षश्रेष्ठींनी त्यांना ही राज्यस्तरीय जबाबदारी दिली आहे. या नियुक्तीबद्दल अमळनेरसह जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा ओघ सुरू आहे. स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आमदार अनिलदादा पाटील यांची नियुक्ती म्हणजे अमळनेरसह उत्तर महाराष्ट्राचा हा सन्मान असल्याच्या भावना व्यक्त केल्या आहेत.

> राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या सक्षम नेतृत्वाखाली, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाला अधिक बळकटी मिळेल. यासाठीच या नव्या प्रवक्त्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रवक्ता म्हणून मला जबाबदारी दिल्याबद्दल सर्वप्रथम त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. प्रवक्ता म्हणून पक्षाच्या धोरणांचा प्रसार, जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका मांडणे. ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारधारा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. माझ्यासोबत प्रवक्ता म्हणून ज्यांची-ज्यांची निवड झाली त्या सर्वांनाही मनापासून शुभेच्छा!
>
> **- आमदार अनिलदादा पाटील.**



# खिशात दोन ५०० रुपयांच्या नोटा ठेवा अन् हा सुंदर देश संपूर्ण फिरून या

**एक रुपयाची किंमत आहे ३०० रुपये**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेकांना पर्यटनाची खूप आवड असते. महागाई आणि वेळेच्या अभावी प्रत्येकालाच ते शक्य होत नाही. मात्र, आता काळजी करू नका. आपण अशा देशाची माहिती जाणून घेणार आहोत, जिथे एक भारतीय रुपयाची किंमत तब्बल ३०० रुपये एवढी होते.

पर्यटन हा तसा सर्वांच्याच आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय आहे. आपण अनेकदा ट्रिप प्लॅन करतो. मात्र महागाई, ट्रेन, विमानाची तिकिटे आणि तिथे राहण्याचा खर्च लक्षात घेऊन नंतर ही ट्रिप रद्द देखील करतो. परदेशात फिरण्यासाठी जायचे हे आपले स्वप्न असते. मात्र, परदेशातील पर्यटन स्थळांना भेट देणे हे तुलनेने देशातील पर्यटन स्थळाला भेट देण्यापेक्षा खूप महागडे असते. ते आपल्या खिशाला परवडणारे नसते. आपण जर अमेरिकेची ट्रिप प्लॅन केली तर आपल्याला या ट्रिपसाठी प्रचंड खर्च येऊ शकतो. याचे कारण म्हणजे अमेरिकेच्या एका डॉलरची किंमत ही सुमारे ८५ भारतीय रुपये आहे.



आपण अशा काही देशांची माहिती जाणुन घेणार आहोत जे देश खूप सुंदर आहेत. या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटन स्थळे आहेत. आणि या देशांमध्ये ज्या चलनाचा वापर होतो त्याची किंमत भारतीय रुपयांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे कमी बजेटमध्ये सुद्धा तुम्हाला परदेशवारी करता येऊ शकतो.

ज्यामध्ये पहिला देश आहे तो नेपाळ. नेपाळमध्ये भारताच्या शंभर रुपयांची किंमत १६० रुपये आहे. त्यामुळे हा देश फिरणे स्वस्त आहे. नेपाळमध्ये अनेक ऐतिहासिक पर्यटनस्थळे आहेत. दुसरा देश आहे कंबोडिया. कंबोडिया देखील जगातील एक सुंदर देश आहे. कंबोडियाची संस्कृती हा विशेष आकर्षणाचा विषय आहे. येथे भारताच्या एका रुपयाची किंमत तब्बल ५० कंबोडियन रियाल एवढी आहे. त्यामुळे तुम्ही अगदी कमी बजेटमध्ये आरामात कंबोडियाची ट्रीप करू शकता. तिसरा देश आहे व्हिएतनाम. व्हिएतनाम हा देश पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू आहे. व्हिएतनाम ट्रिप तुम्ही अगदी कमी खर्चात करू शकता. कारण तेथे भारताच्या एक रुपयाची किंमत तब्बल ३०० रुपये एवढी आहे. त्यामुळे तुम्ही अगदी कमी बजेटमध्ये संपूर्ण व्हिएतनाम फिरू शकता.

## संसार न मोडला..! स्वाभिमान न ढळला...!!



*दिवसभराच्या कष्टाने पुरते झिजले. मात्र त्यानंतरही अंगावरून घामाच्या धारा गाळत बोरी नदीच्या पुलावरून शनिवारी सायंकाळी सायकलवर लाकडांची गंजी घेऊन जाताना हे कष्टकरी दादा मावळत्या सूर्याच्या साक्षीने संसाराची उमेद कायम ठेवण्याचाच जणू संदेश देत असावेत.* (छायाचित्र : मयूर चौधरी)

# मुंबईत १० कोटींच्या एका सफरचंदाची तुफान चर्चा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबईत सध्या एका सफरचंदाची तुफान चर्चा होत आहे. या सफरचंदाची किंमत आहे १० कोटी रुपये. एवढेच नाही तर या सफरचंदाची नोंद ही इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली आहे. या सफरचंदाची एवढी किंमत का आहे? त्यात असे काय खास आहे ? चला जाणून घेऊयात. कधी कोणती गोष्ट व्हायरल होईल सांगता येत नाही. सध्या मुंबईत अशीच एक बाब प्रचंड व्हायरल होत आहे. ती वस्तू म्हणजे एक सफरचंद. मात्र, हा सफरचंद काही सामान्य नाही तर हे सफरचंद चक्क १० कोटींचे आहे. प्रत्येक मुंबईकराला या सफरचंदाची एक झलक पाहायची आहे.

या सफरचंदाची एवढी किंमत आहे कारण ते पूर्णपणे ९ कॅरेट ३६ सेंट हिरे आणि १८ कॅरेट सोने वापरले गेले आहेत. हे सफरचंद बनवले आहे रोहित पिसाळ यांनी. रोहित पिसाळ यांना गोल्ड मॅन म्हणून ओळखले जाते. सध्या थाई रॉयल पॅलेसमध्ये ते विक्रीसाठी आहे. श्री. पिसाळ यांनी हे सफरचंद अतिशय काळजीपूर्वक डिझाइन केले आहे. त्यामुळे ते अतिशय आकर्षक दिसत आहे.

### असे काय खास आहे या सफरचंदात

प्रमाणपत्रानुसार हे सफरचंद ९ कॅरेट ३६ सेंट हिऱ्यांनी जडवलेले आहे. १८ कॅरेट सोन्याचे वजन अंदाजे २९ ग्रॅम आहे. यात एकूण १ हजार ३९६ तुकडे वापरले गेले. सफरचंदाचे सौंदर्य आणि कारागिरी पाहता, या सफरचंदांचे नाव थेट इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवले गेले आहे.

### थायलंडमध्ये मागणी वाढली

जगप्रसिद्ध वर्ल्ड इंटरनॅशनल जेमोलॉजिकल इन्स्टिट्यूटने देखील या सफरचंदाचे प्रमाणन केले आहे. शिवाय, ते आता थायलंडमधील रॉयल पॅलेसमध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे. जिथे या सफरचंदाची मागणी आणखीणच वाढल्याचे दिसत आहे. ते जास्त किमतीत खरेदी करण्यासाठी ग्राहक तयार असल्याचे म्हटले जात आहे.



# उमेदवारीसाठी मार्च २०२६ पर्यंतची घरपट्टी, नळपट्टी भरण्याची अट रद्द करा!

### अनंता निकम, संदीप घोरपडेंचे सहायक निवडणूक अधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणुकीच्या उमेदवारीसाठी मार्च २०२६ पर्यंतची घरपट्टी, नळपट्टीची अट घालण्यात आली आहे. मात्र, ही अट रद्द करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते श्री. संदीप घोरपडे व श्री. अनंत निकम यांनी केली आहे. याबाबत त्यांनी सोमवार, दि. १० रोजी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी निवृत्ती गायकवाड यांना निवेदन दिले आहे.



निवेदनात म्हटले आहे, की वर्ष २०२४- २५ ची घरपट्टी व नळपट्टी पूर्णतः भरण्यात आलेली आहे.

मात्र, पालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरताना पालिकेने मार्च २०२६ पर्यंतची नळपट्टी व पाणीपट्टी पूर्ण भरण्याचीही अट घातली आहे. ही बाब गैर आहे. तसेच शौचालय असल्याबाबतचा दाखला प्राप्तीसाठी पालिकेकडून ५०० रुपये कर आकारला जात आहे.

हा झिजिया कर आकारणेही गैर आहे. ही वसुली तत्काळ थांबविण्यात यावी. निवेदनावर अनिंत निकम व संदीप घोरपडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मसाला पान



# साबण : गुणधर्मानुसार बहुपयोगी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

साबणाचे अस्तित्व अगदी अर्वाचीन वाटत नाही. हिंदुस्थानातही तीन-चारशे वर्षांपूर्वी साबण दिल्ली, आग्रा, कपडगंज इत्यादी ठिकाणी होत होता. तो पापडखार, खारी माती, चुना व तेल यांच्या सहाय्याने कारीत असत व अजूनही करतात. परंतु आपल्याकडे साबणाचा उपयोग नुसता कपड्यास लावण्याकरिताच करीत असत. हल्ली साबणाचे अनेकविध उपयोग होऊ लागले आहेत.

साबणास लागणारे रासायनिक द्रव, कॉस्टिक सोडा व पोट्याश हे द्रव मुख्य होत. पहिल्यापासून घट्ट व दुसऱ्यापासून पातळ साबण होतो. या दोन्हीही तेलांमध्ये वनस्पती व प्राणी तेले वापरतात. धार्मिक अडचणीमुळे हिंदुस्थानात वनस्पती तेलच वापरतात. याशिवाय साबणात मिश्रण करण्याकरिता सोडियम सल्फेट, पापडखार, खडू इत्यादींचाही उपयोग करतात.

**साबणास लागणारी तेले :** या तेलांचे स्थूलमानाने खनिज, प्राणीत व वनस्पतीज असे तीन भाग पाडता येतील. या निरनिराळ्या तेलांचा उपयोग निरनिराळ्या प्रकारचा साबण तयार करण्याकडे होतो.

(१) खनिज तेलांत पॅराफिन व व्हॅसेलीन ही मुख्य होत.

(२) प्राणीज तेलात- मेण, चर्बी, माशाचे तेल इत्यादी मुख्य होत.

(३) वनस्पतीज तेलांत जननी मेण, कोंकमतेल, खोबरेल मोईडा तेल ही मुख्य होत. याशिवाय जवस, खसखस व कित्येकांत तूपही घालतात. साबणाची कृती एकच अशी नाही. निरनिराळ्या प्रकारच्या साबणांना त्यांच्या गुणधर्माप्रमाणे निरनिराळे पदार्थ कमी-जास्त प्रमाणात घालावे लागतात.

साबणाच्या मुख्य कृती या दोन आहेत. पहिली थंड कृती व दुसरी गरम कृती.

**१) थंड कृती :** दिखाऊ साबण फक्त या कृतीने करतात. याला श्रम थोडे लागतात व यामध्ये पाणी फार मिसळावे लागत नसल्यामुळे याला जळण कमी लागते. साबण वाळण्यासही वेळ लागत नाही. पण ही कृती कितीही जपून केली तरी या कृतीने तेल व सोडा यांचा पूर्ण संयोग होत नसल्यामुळे यामध्ये सोडा जरा जास्त राहतो. या सोड्याचा परिणाम त्वचेवर होतो. हा अंगास लावल्यास अंगाची आग होते व अंग मऊ न होता खरखरीत होते. बहुतेक नवे व छोटे कारखानदार याच कृतीचा अवलंब करतात. पण या साबणास चांगले व कायमचे ग्राहक मिळत नाही. तरी या साबणाचा कपडे धुण्याकडे व यांत्रिक काम केल्याने मळलेले हात धुण्याकडे चांगला उपयोग होतो. हा साबण खोबरेल तेलाचा फार लवकर तयार होतो. कारण तीव्र द्रवाने याचा साबण लवकर बनतो.

**खोबरेल तेलाचा थंडा साबण**

१५ पौंड उत्तम खोबरेल तेल घ्यावे व ते थोडे गरम करावे. त्यांत ९८-९९ अंशाचा सोड्याचा द्रव घालावा व मिश्रण चांगले अर्धा-पाऊण तास ढवळावे. सोड्याचा द्रव करण्यासाठी ३ पौंड सोड्याची पूड घेऊन तीत १२ पौंड म्हणजे चौपट पाणी घालावे. हा द्रव अल्युमिनियमच्या किंवा लोखंडाच्या भांड्यांत करावा. साबण लवकर घट्ट व्हावा अशी इच्छा असल्यास सोड्यांत फक्त ६ किंवा ७ पौंड म्हणजे सुमारे दुप्पट पाणी घालावे. या सोड्याचा द्रव फक्त पाणी व सोडा मिसळून ढवळल्याने होतो. तो द्रव होताना आधणाच्या पाण्याइतका गरम होतो. हा जरा निवून द्यावा. खोबरेल तेल व हा सोडा या दोहोंची उष्णता सारखी ठेवावी. ही उष्णता १५०० किंवा १५५० अंशांपर्यंत ठेवावी. दोहोंचें मिश्रण सारखे ठेवल्याने साबण लवकर होतो. मग हे मिश्रण चांगले ढवळावे. हे मिश्रण मग घट्ट होऊ लागेल. ते काकवीहून जास्त घट्ट झाले म्हणजे ते ढवळण्याचे बंद करावे. हा द्रव एका चौकोनी लोखंडी पेटीत घालून तीवर लोकरीची फडकी गुंडाळून ती एका बाजूस गरम ठिकाणी ठेवावी. पाणी दुप्पट घातले असेल तर साबण तीन दिवसांत तयार होईल. चौपट घातले असेल तर साबणास आठ दिवस लागतील. साबणात पाणी जास्त घातले म्हणजे त्याचा एकजीव चांगला होतो व क्षार जरा कमी सुटा राहतो. साबण घट्ट झाला म्हणजे त्याच्या बाजू वाळू लागतील. मग ती पेटी एक दिवस उघडी ठेवावी, पालथी घालावी व पेटीच्या बुडावर जरा ठोकावे. म्हणजे साबणाची ढेप खाली पडेल. त्यानंतर त्यावर सारख्या अंतरावर खुणा करून त्या खुणांवरून तुकड्यांचे बार कापावे.



**धुण्याचा थंडा साबण**

खोबरेल ५ पौंड, चरबी ६ पौंड. ९८-९९० अंश सोडा २ पौंड व पाणी ६ पौंड. कृती वरीलप्रमाणे. अशा रीतीने साबण तयार झाला म्हणजे पेटीत घालण्यापूर्वी त्यात १ पौंड पापडखार व ३ पौंड पाणी यांचा द्रव घालावा व ते मिश्रण चांगले ढवळावे व त्याचा एकजीव करावा. पापडखाराऐवजी सिलीकेट ऑफ सोडा वापरला तरी चालेल. या साबणास रंग द्यावयाचा असल्यास तो प्रथम तेलात किंवा सोड्यांत मिसळावा. तसेच वास द्यावयाचा असल्यास सोडा ढवळून झाल्यावर मग वास घालून ढवळावे. वास देण्यापूर्वी रंग दिला तरी चालेल. सोडा मिसळताना वास देऊ नये. कारण त्यामुळे बराच वास फुकट जातो.

**साबणाची गरम कृती :** खोबरेल किंवा समुद्र साबण : प्रमाण : १५० पौंड खोबरेल, ९८-९८ सोडा २७ पौंड + पाणी २७० या कामी २ लोखंडी कढया पाहिजेत. एक २५० पौंड पाणी मावेल इतकी असावी व दुसरी ५०० पौंड मावेल इतकी असावी. वर लिहिलेल्या मिश्रणाहून कमी किंवा जास्त ज्या प्रमाणाने साबण करावयाचा असेल त्यामानाने कढया असाव्यात. लहान कढईत सोड्याचा द्रव करावा. मोठ्या कढईत साबण करावा. मोठ्या कढईत खोबरेल घालावे व ते साधारण गरम करावे. म्हणजे वितळू लागेल. मग त्यांत सोड्याचा द्रव थोडा-थोडा घालून ते मिश्रण लांकडाच्या वल्ह्यानेंसारखे आतल्या आत ढवळावे. या कामी लहान होडग्याची जुनी वल्ही मिळाली तर बरे. नाही तर सागवानाचे किंवा देवद्वार लांकडाचे ढवळणे तयार करावे. सागवानाच्या ढवळण्याचा रंग प्रथम थोडासा साबणास येईल. पुढे फारसा येणार नाही. देवद्वाराचा तर फारच थोडा रंग येतो. सोड्याचे पाणी संपेपर्यंत साबण शिजवावा. याला शिजण्यास सुमारे पाच सहा तास लागतात. सोड्याचा द्रव एवढ्या वेळात संपेल अशा रीतीनेच मंदाग्नीवर साबण शिजविला पाहिजे. नाहीतर आणखी जास्त पाणी घालावे लागेल. त्यामुळे जळणाचा खर्च विनाकारण जास्त होईल. त्याचप्रमाणे साबण उतू जाऊ नये, अशी व्यवस्था करावी. मोठ्या कारखान्यांत साबणांत वाफेच्या नळ्या सोडून त्याने साबण शिजविण्याची व ढवळण्याची व्यवस्था केलेली असते. जळणासाठी लाकूड किंवा शेणी वापराव्यात. पण साबण मोठ्या प्रमाणावर करावयाचा असल्यास भट्टींत लोखंडाची जाळी घालून तींत दगडी कोळसा वापरावा. दगडी कोळशाबरोबर इतर फुकट जाणारे जळणही वापरले तरी चालेल.

**साबण शिजविणे :** तेलात प्रथम सोड्याचे पाणी घालताच तेल पांढरट होऊ लागते. मग पुढे आणखी सोडा घातल्यास व पंधरा-वीस मिनिटे शिजविल्यास खाली साबण अर्धवट बनलेला दिसेल व वरती तेलाचा थर दिसेल. सुमारे तीन तासांनी साबणाचा रंग पिवळट व अर्धवट पारदर्शक होऊ लागेल. पाच तास पुरे झाल्यावर सर्व साबण पारदर्शक म्हणजे पाण्यासारखा दिसू लागेल. असा रंग आला म्हणजे साबण होत आला असे समजावे. असा रंग आल्यावर थोडा साबण काचेवर घालावा. म्हणजे चार-पांच मिनिटांत तो साबण थंड व घट्ट होऊन त्याचा कळपा निघेल. याने हात धुऊन पाहावा. हाताला जास्त बुळबुळीतपणा लागून ओढ लागल्यासारखे वाटल्यास त्यात सोडा अद्याप चांगला मिसळला गेला नाही, असे समजावे. साबण बुळबुळीत लागून फेस कमी निघाल्यास तेल जास्त आहे असे समजावे. साबणामध्ये चुकून तेल किंवा सोडा जास्त झाल्यास पुन्हा ते पदार्थ घालून साबण शिजवावा. पण अशावेळी साबण पुन्हा चार-पाच तास शिजवावा लागेल व साबण चांगला बनणार नाही. साबण काचेवरून निघू लागल्यापासून अर्धा तास आणखी शिजवावा व त्यात रंग घालावा. साबण साधारण निवण्यास सुमारे दोन-तीन तास लागतात. अंघोळीच्या पाण्याइतका निवाल्यावर त्यात वास घालावा व मग पेटीत ओतावा. साबण पेटीत घालून तो घट्ट होण्यासाठी तसाच ठेवावा. सुमारे ३०-४० तासांनी साबण अगदी घट्ट होईल. मग ठराविक पद्धतीने साबणाची ढेप काढून त्याचे बार, वड्या वगैरे कापाव्यात. अंगाला लावण्याचा साबण एकदम करीत नाहीत. तेल व सोडा यांचा साबण करून ठेवतात. त्यानंतर तो पुन्हा वितळवून त्यात रंग घालतात व वास देतात. अशा साध्या साबणास सांटवणीचा साबण असे म्हणतात.

**साबणाची परीक्षा**

१) साबण जिभेला लावल्यास जिभेला चटका बसल्यास त्यात सोड्याचा भाग जास्त आहे, असे समजावे. साधारण क्षारासारखा लागल्यास सोडा व तेल योग्य प्रमाणात असून, साबण चांगला शिजला गेला आहे असे समजावे. तेलकट लागल्यास तेल जास्त झाले आहे, असे समजावे. (२) रेड लिटमन पेपर घेऊन तो साबणाच्या पाण्यात घालावा. तो जशाचा तसाच राहिल्यास साबण चांगला झाला, असे समजावे व फिक्कट निळा झाल्यास सोड्याचा भाग जास्त आहे, असे समजावे. पण असा साबण उपयुक्त आहे असे समजावे. गडद निळा झाल्यास सोड्याचा अंश जास्त आहे, असे समजावे. खोबरेलचा साबण मिठाच्या पाण्यात वितळत असल्यामुळे हा साबण करताना सोडा व तेल अगदी बिनचूक मोजून घ्यावे. साबू निरनिराळ्या प्रकारचे असतात. अंगास लावण्याचा, कपडे धुण्याचा, खरुजनाशक, खवडेनाशक, सुगंधी साबण, औषधी साबण, हजामतीचा साबण, दंतमंजनाचा साबण इत्यादी साबणाचे प्रकार असून त्यात कित्येक उपप्रकारही असतात. कपडे धुण्याच्या साबूंत अल्कली थोडी जास्त टाकावी लागते. पण तो अधिक स्वस्त करण्यासाठी त्यात सोड्याचे सिलिकेट, कार्बोनेट, (सल्फेट वगैरे क्षार, मीठ, खडू, शंखजिरे, तुरटी, कोंडा, चिकणी व चिनीमाती, लाकडाचे भूस, बटाट्याचे व धान्याचे पीठ, रेती, दगडाची भुकटी, गूळ किंवा साखर पाणी वगैरे घालतात; स्वस्त, हलके जिन्नस मिसळून त्याचे वजन वाढवितात. साबणासाठी लहान-मोठ्या कढया मिळतात. साबणाच्या ढेपीच्या पेट्या, साबण कापण्याची लांकडी यंत्रे, वड्या दाबण्याचे प्रेस, साचे वगैरे साहित्य मेसर्स तांबट ब्रदर्स, एन्जिनियर्स-ग्वाल्हेर येथे व मेसर्स आगलवाडा ॲन्ड सन्स, बंगलोरी कौलांचे कारखानदार धारवाड यांच्याकडे मिळतात. साबणाच्या किंवा इतर कोणत्याही धंद्यात मुख्य ध्यानात ठेवण्याच्या गोष्टी म्हटल्या म्हणजे कारखान्यास मुबलक जागा, भरपूर पाणी, तेल वगैरेंचा पुरवठा, विक्रीची सोय आणि माल पाठविण्यासाठी स्टेशन किंवा बंदर जवळ या होत. त्याचप्रमाणे माल तयार करताना नेहमी एकाच नमुन्याचा झाला पाहिजे. प्रसंगी नुकसान झाले तरी त्याच्या गुणधर्मात फरक पडू देऊ नये. प्रथमच माल बाहेर काढण्यापूर्वी महाग माल जितका कमी वापरता येईल तितका वापरावा. स्वस्त माल जितका जास्त वापरता येईल तितका चांगला. नवीन सुधारणा करणे झाल्यास पूर्वीचे गुणधर्म न वाढले तरी चालतील. मात्र कमी होता कामा नये. नाहीतर ग्राहक विनाकारण नाखूश होईल व मालावरचा लोकांचा विश्वास कमी होईल. लोकांचा उत्तरोत्तर विश्वास वाढला पाहिजे, असेच धोरण स्वीकारले पाहिजे.

# अभिषेक बच्चनसोबतच्या घटस्फोटावर स्पष्टच बोलली ऐश्वर्या राय; म्हणाली, प्रयत्नच नाही

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

ऐश्वर्या राय आणि अभिषेक बच्चन बॉलीवूडच्या सर्वाधिक चर्चेत राहणाऱ्या जोडप्यांपैकी एक आहे. त्यांच्या प्रत्येक गोष्टीवर चाहत्यांच्या बारीक नजरा असतात. काही दिवस एकमेकांना डेट केल्याने २००७ मध्ये त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. मात्र, लग्नाच्या इतक्या दिवसांनंतर त्यांचे नाते जोरदार चर्चेत असून दोघे घटस्फोट घेणार असल्याचे सांगितले जाते. अभिषेक आणि ऐश्वर्याच्या घटस्फोटाच्या चर्चांनी चाहत्यांना मोठा धक्का बसला. मात्र, बच्चन कुटुंबीयांपैकी कोणीही यावर भाष्य केले नाही किंवा चर्चा चुकीच्या असल्याचेही पुढे येऊन कोणीही सांगितले नाही. मध्यंतरी असेही सांगितले जात होते, की ऐश्वर्या राय हिने जलसा बंगला सोडला असून ती तिच्या आईसोबत राहत आहे. ऐश्वर्याने घटस्फोटाबद्दल भाष्य केले. अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय बच्चन एका शोमध्ये दिसले. यावेळी आपल्या खासगी आयुष्याबद्दल बोलताना दोघेही दिसले. पहिल्यांदाच घटस्फोटाबद्दल बोलताना ऐश्वर्या दिसली. ऐश्वर्या रायने स्पष्ट शब्दांत सांगितले, की आम्ही घटस्फोटासारख्या गोष्टींचा विचारही करत नाहीत. हेच नाही तर ऐश्वर्या राय हिने बच्चन कुटुंबीयांसोबत राहण्याबाबतही मौन सोडले. जया बच्चन यांच्याबद्दल भाष्य करणे यावेळी तिने टाळले. बच्चन कुटुंबीयांसोबत राहण्याचा अनुभव सांगताना ऐश्वर्या राय दिसली. ऐश्वर्या राय हिने दिलेली ही मुलाखत जुनी असून, सध्या चर्चेत आली आहे. ऐश्वर्या राय हिने देखील घटस्फोटाच्या चर्चांवर भाष्य करणे टाळले आहे. २००७ मध्ये ऐश्वर्या राय आणि अभिषेकने लग्न केले. अभिषेकने चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान विदेशात असताना ऐश्वर्या रायला प्रपोज केला. त्यानंतर काही दिवसांमध्येच तिने अभिषेक बच्चनसोबत लग्न केले.

सलमान खान याच्यासोबतच्या ब्रेकअपनंतर तिने अभिषेकला जीवनसाथी बनविले. विशेष म्हणजे दोघांनी अत्यंत शाही पद्धतीने लग्न केले. मात्र, दोघांच्या नात्याबद्दल काही दिवसांपासून विविध चर्चा या रंगताना दिसल्या. ऐश्वर्या राय कायमच मुलगी आराध्या बच्चन हिच्यासोबत विदेशात जाताना दिसते. जास्त करून ती आराध्यासोबतच जाते. अभिषेक बच्चन याच्यासोबत फार कमी वेळेला ऐश्वर्या राय स्पॉट होताना दिसते. यामुळे त्यांच्या घटस्फोटाच्या चर्चांना एकप्रकारे उधाण आले आहे.



# बिना कोचिंग, सेल्फ स्टडी से यूपीएससी पास कर आयएएस बनीं तपस्या परिहार : एआयआर २३ की प्रेरक कहानी

सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

यूपीएससी सिविल सर्विस परीक्षा देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक है। इसमें सफलता पाने के लिए समर्पण, दृढ़ निश्चय, आत्मविश्वास और सुनियोजित रणनीति की आवश्यकता होती है। आयएएस तपस्या परिहार की कहानी इन्हीं गुणों का मिश्रण है। एक साधारण लड़की ने बिना कोचिंग, केवल सेल्फ स्टडी के दम पर यूपीएससी पास कर आयएएस बनने का सपना पूरा किया। आइए, जानते हैं उनकी प्रेरक कहानी।

**वकालत छोड़कर शुरू की यूपीएससी की तैयारी**

मध्य प्रदेश के नरसिंहपुर की रहने वाली तपस्या परिहार ने स्कूली शिक्षा नरसिंहपुर के केंद्रीय विद्यालय से पूरी की। इसके बाद उन्होंने पुणे के इंडिया लॉ सोसाइटी लॉ कॉलेज से एलएल.बी. की डिग्री हासिल की। स्नातक होने के बाद उन्होंने वकालत छोड़कर यूपीएससी की तैयारी शुरू की। कोचिंग का सहारा न लेते हुए उन्होंने सेल्फ स्टडी को अपनी ताकत बनाया और पूरे समर्पण के साथ पढ़ाई में जुट गईं।

**पहले प्रयास में असफलता, फिर दृढ़ता से जीत**

यूपीएससी की तैयारी अपने आप में एक बड़ी चुनौती है। तपस्या ने केवल सेल्फ स्टडी के बलबूते पहला प्रयास किया, लेकिन उन्हें असफलता मिली। फिर भी, उन्होंने हार नहीं मानी। अपनी कमियों को पहचानकर उन पर काम किया, पढ़ाई के घंटे बढ़ाए और रणनीति में बदलाव किया। उनके दृढ़



निश्चय और आत्मविश्वास ने उन्हें दूसरे प्रयास में सफलता दिलाई। २०१७ में उन्होंने यूपीएससी सिविल सर्विस परीक्षा पास की और अखिल भारतीय रैंक २३ हासिल किया।

**वर्तमान पोस्टिंग और व्यक्तिगत जीवन**

तपस्या परिहार वर्तमान में मध्य प्रदेश के छतरपुर में आयएएस अधिकारी के रूप में तैनात हैं। दिसंबर २०२१ में उन्होंने भारतीय वन सेवा अधिकारी गर्वित गंगवार से शादी की। उनकी शादी चर्चा में रही, क्योंकि उन्होंने पारंपरिक "कन्यादान" प्रथा को नकार दिया। समारोह के दौरान तपस्या ने अपने पिता से कहा, "मैं कोई दान की वस्तु नहीं हूँ," और इस प्रथा का हिस्सा बनने से इनकार किया।

तपस्या परिहार की कहानी उन सभी के लिए प्रेरणा है जो यूपीएससी की तैयारी कर रहे हैं। उनकी सफलता सिद्ध करती है कि कोचिंग के बिना भी मेहनत, दृढ़ता और सही रणनीति से लक्ष्य हासिल किया जा सकता है। उनकी कहानी यह भी दर्शाती है कि असफलता को सीढ़ी बनाकर सफलता की ओर बढ़ा जा सकता है।

# प्लास्टिक कपात डाळभात, फरशीवरच झोप, नाममात्र टॉयलेट; भारतीय महिला क्रिकेट संघाने संघर्षातून घडविला इतिहास

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय महिला क्रिकेट संघाने विश्वचषक जिंकून इतिहास घडविला आहे. आयसीसी महिला विश्वचषकावर मोहोर लावण्यासाठी त्यांनी दक्षिण आफ्रिकेला अटीतटीच्या सामन्यात पराभूत केले. मात्र, फायनलला पोहोचेपर्यंतचा महिला क्रिकेट संघाचा प्रवास नक्कीच सोपा नव्हता. कायम दुय्यम म्हणून हिणवल्या गेलेल्या महिला संघाने विश्वचषक जिंकून नुसताच इतिहास घडवला नाही, तर त्यांच्या आतापर्यंतच्या संघर्षाची ही इतिश्री झाली आहे. पुरुष संघापेक्षा त्यांना आता दुय्यम मानले जाणार नाही.

**भारतीय महिला संघाने मोठा पल्ला गाठला**

भारतीय महिला संघाने आता क्रिकेट जगतात मोठा पल्ला गाठला आहे.




सुरूवातीला महिला खेळाडूंना मोठा संघर्ष करावा लागला. महिला क्रिकेट संघाविषयी कायम अनास्था, उदासीनता होती. त्यांना मोठा निधीही दिला जात नव्हता. महिला क्रिकेट संघाच्या सुरूवातीच्या दिवसांतील संघर्षगाथा आता जवळपास संपुष्टात आली आहे. या महिला खेळाडूंना देशातच नव्हे, तर परदेशातही जमिनीवर, फरशीवर झोपावे लागत होते. कमी पैशात तजवीज करावी लागत होती. प्लास्टिक कपातून डाळभात खावा लागत होता. २० खेळाडूंसाठी केवळ ४ टॉयलेटची सोय असायची. स्वतंत्र रूम असणे हे तर दिवास्वप्नच होते. अशा परिस्थितीतून वाटचाल करत आता महिला क्रिकेट संघाने दूरचा प्रवास करीत मोठा टप्पा पार केला आहे. हे अंतर कापणे नक्कीच सोपे नव्हते. या टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी महिला खेळाडूंना मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागले. भारतात क्रिकेटची क्रेझ असली, तरी महिला क्रिकेटकडे प्रेक्षकांपासून प्रशासनापर्यंत सर्वांचीच उदासीनता होती. त्या काळाच्या संघर्षातून तर आता आयसीसी महिला विश्वचषक प्राप्त करेपर्यंतची महिला क्रिकेट संघाची ही कामगिरी नक्कीच अभिमानास्पद आहे.

नवी मुंबईतील डी.वाय. पाटील मैदानावर भारतीय क्रिकेट महिला संघ विश्वचषक मिळविण्यासाठी दक्षिण आफ्रिकेसोबत नुसताच भिडला नाही. त्यांनी अपार मेहनतीच्या जोरावर विश्वचषकावर शिक्कामोर्तब केला. शांता रंगास्वामी आणि नूतन गावस्कर यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाच्या प्रवासाची संघर्षगाथा खऱ्या अर्थाने समोर आणली. त्यावेळी महिला संघासाठी पैशांची फारशी तजवीज नसायची. प्रायोजक मिळायचा नाही. देशातच अशी स्थिती असताना परदेश दौरा तर दिवास्वप्नच असायचे. पण

**विमानाची तिकिटे मिळविण्यासाठी दमछाक**

परदेशात सामना खेळण्यासाठी जाणे हे महिला क्रिकेट संघासाठी दिव्यच असायचे. कारण तिकीट खरेदीपासून मारामार सुरू व्हायची. त्यासाठी प्रायोजक शोधावे लागायचे. एनआरआय खेळाडूंचे पालक त्यासाठी योगदान द्यायचे. मंदिरा बेदी यांनी महिला खेळाडूंसाठी विमानाची तिकिटे काढल्याचे आणि अनेकदा एअर इंडियाने या तिकिटांचा खर्च उचलल्याची आठवण नूतन गावसकर यांनी सांगितली.

आम्ही पुढेच जाणार, हा निर्धार महिला क्रिकेटर्सने मनाशी केला होता, असे नूतन गावसकर यांनी अनुभवकथन केले. नावाजलेले खेळाडू सुनील गावस्कर यांच्या त्या भगिनी आहेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# कोणताही क्लास न लावता सहावेळा एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण

## नांदेडचा ओमकेश जाधव झाला 'क्लास वन' अधिकारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्वप्न साकार करण्यासाठी जिद्द, मेहनत आणि संयम लागतो. कोणतेही क्लासेस न लावता स्वयंअध्ययातून यश मिळविता येते हे नांदेड ओमकेश जाधव या तरुणाने सिद्ध करून दाखवले आहे. शासकीय सेवेत कार्यरत असताना अधिकारी बनण्याचे त्याचे स्वप्न होते. एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे. क्लास वन अधिकारी म्हणून सहभागी होण्याचा बहुमान त्याने मिळविला. विशेष म्हणजे, ओमकेशने एक-दोन वेळा नाही, तर तब्बल सहावेळा एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली आहे.

**गरिबांचे जीवनमान सुधारणे**

ओमकेशचे यश हे केवळ त्याच्या वैयक्तिक करिअरसाठी नाही, तर समाजातील वंचित, उपेक्षित आणि गोरगरीब लोकांसाठी योगदान देण्याच्या ध्येयाने प्रेरित आहे. फक्त अधिकारी बनणे नव्हे, तर समाजातील जनतेच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे हे आहे. आज त्याचे यश स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. मेहनत, जिद्दी कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे त्याने दाखवून दिले आहे.

**आमकेश उपशिक्षण अधिकारी**

ओमकेश हा नांदेड शहरातील सिडको भागातील रहिवासी आहे. त्याचे वडील उत्तमराव जाधव हे जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ओमकेश सध्या हिंगोली जिल्हा परिषद कार्यालयात उपशिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत आहे. ओमकेशने स्पर्धा परिक्षांचे क्लासही लावले नव्हते. लहानपणापासूनच त्याचे मोठा अधिकारी होण्याचे स्वप्न होते. यासाठी २०१९ पासून त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली होती. पुणे शहरात तो एकटा राहुन अभ्यास करत होता. २०२० मध्ये त्याने एमपीएससी परीक्षा दिली. मात्र, त्याला अपेक्षित यश मिळाले नाही. त्याचा १२६ वा रँक आला. यामध्ये त्याला शासकीय सेवेत संधी मिळाली नाही. तरीही त्याने खचून न जाता प्रयत्न सुरूच ठेवले. ओमकेशची जिद्द २०२१ मध्ये दिसली. तेव्हा त्याची कामगार अधिकारी पदावर निवड झाली. त्यानंतर, २०२२ मध्ये त्याची उपशिक्षण अधिकारी पदावर निवड झाली. २०२३ आणि २०२४ मध्येही तो यशस्वी ठरला. पाचव्या प्रयत्नातही त्याची हिंगोली जिल्ह्यात उपशिक्षण अधिकारी म्हणून निवड झाली. त्याच वेळी २०२४ मध्ये त्याने प्रशासकीय अधिकारी परीक्षेत राज्यात ५४वा रँक मिळवला. एकूण सहावेळा स्पर्धा परीक्षा देऊन ओमकेश प्रत्येकवेळी उत्तीर्ण झाला. भविष्यात गट विकास अधिकारी, जीएसटी विभागात सहायक आयुक्त अथवा उद्योग उपसंचालक पदावर काम करण्याची संधी मिळेल, असा त्याला विश्वास आहे. शालेय शिक्षण नायगाव तालुक्यात ओमकेशचे प्राथमिक शिक्षण नायगाव तालुक्यातील जनता हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर, पुढील शिक्षणासाठी त्याने नवोदय विद्यालयात प्रवेश घेतला. उच्च शिक्षणासाठी ओमकेशने पुणे येथील डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन इंजिनिअरिंग पूर्ण केले.

**आई-वडिलांचे मोठे योगदान**

ओमकेशला या यशाच्या मार्गावर नेहमीच आई-वडिलांचे प्रोत्साहन आणि सहकार्य मिळाले. त्याचे वडील उत्तमराव जाधव आणि आई सुमन जाधव यांचे त्याच्या आयुष्यात मोठे योगदान होते. आपल्या मुलाला अधिकारी बनवण्यासाठी त्यांनी कोणत्याही गोष्टीची कमतरता पडू दिली नाही. प्रत्येक टप्प्यावर त्याला आवश्यक ते सहकार्य केले. त्याच्या यशामुळे कुटुंबातील आई-वडिलांचा आनंद द्विगुणित झाला आहे. मुलाने यशाचे शिखर गाठल्यामुळे त्यांचे स्वप्न साकार झाले. त्यांना कष्टाचे फळ मिळाल्याची त्यांची भावना आहे.








# स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदेच घेतील!

## पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील; अमळनेरला शिवसेनेचा निर्धार मेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- पालिका निवडणूक ही महायुतीकडून लढवावी की स्वबळावर याबाबत मी आजच रात्री आपले नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणार आहे. आपल्या भावना त्यांच्यापर्यंत पोहोचविणार आहे. ते काय निर्णय घेतात हे मी लवकरच आपल्याला कळविन, असा सबुरीचा सल्ला शिवसेनेचे उपनेते तथा पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी कार्यकर्त्यांना दिला.

येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात रविवार, दि. ९ रोजी सायंकाळी झालेल्या शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. माजी आमदार शिरीषदादा चौधरी, शिवसेनेचे शहरप्रमुख संजय पाटील, रोहित कोकटा, प्रथमेश पवार, प्रमिलाताई गोसावी, प्रवीण पाटील, महेश देशमुख, चित्रलेखाताई महाजन आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

ना. गुलाबराव पाटील पुढे म्हणाले, की पालिका निवडणूक स्थानिक पातळीवर कशी लढवायची याचा निर्णय ना. एकनाथ शिंदे हे घेतील. वरिष्ठांनी दिलेला निर्णय आपल्या सर्वांना मान्य राहील. सर्वांनी पालिका निवडणूक जिंकण्यासाठी एकजुटीने काम करावे. ना. एकनाथ शिंदे कार्यकर्त्यांचा आदर करणारे नेते आहेत. त्यामुळे सर्वांनी निष्ठेने काम करुन आपले उमेदवार कसे निवडून येतील यासाठी प्रयत्न करावेत. माजी आमदार शिरीषदादा चौधरी म्हणाले, की स्वबळावर निवडणूक लढवावी असा कार्यकर्त्यांचा आग्रह आहे. त्यामुळे आपण स्वबळावर निवडणूक लढविण्यासाठी सिग्नल द्यावा, असे आवाहन श्री. शिरीषदादा चौधरी यांनी पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांना केले. सौ. सुरेखाताई पवार, सौ. सरिताताई माळी यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

दरम्यान, सुनील भामरे यांनी ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते श्री. शिरीषदादांनी शिवसेनेत मुंबई येथे प्रवेश केल्याची सुबक प्रतिमा भेट दिली. माजी नगरसेवक प्रवीण पाठक यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी काँग्रेसचे रियाजुद्दीन मौलाना यांनी ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते शिवसेनेत प्रवेश घेतला.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



## मग या तरुणाची कहाणी वाचाच; हजारो हत्तींचे मिळेल बळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुष्यात अनेक संकटे येतात, नैराश्य येते. मात्र, त्यावर मात करायची की परिस्थितीला दोष द्यायचा? एकदा या तरुणाची कहाणी वाचाच. यातून हजारो हत्तींचे बळ मिळेल.

काहीतरी करण्याची इच्छा मनात असेल तर, असंख्य अडथळे आल्यानंतर देखील लक्ष्य साध्य करता येते हे आयएएस पवन कुमार यांनी दाखवून दिले आहे. गरिबीत देखील त्यांनी माघार घेतली नाही. पावसाळ्यात छतावरून पाणी टपकणाऱ्या घरात शिक्षण घेणाऱ्या पवन कुमार यांनी कधीही हार मानली नाही. पवन यांनी कुटुंबाच्या संघर्षाची किंमतही चुकवली. आपल्या कठोर परिश्रमाने २०२४ च्या यूपीएससी स्पर्धा परीक्षेमध्ये २३९ वा क्रमांक मिळवून कुटुंबाला सन्मान मिळवून दिला. उंचगाव ब्लॉकमधील रघुनाथपूर गावातील रहिवासी पवन यांची कहाणी संघर्षमय आहे. त्यांच्या वडिलांनी मुलाच्या मेहनतीचे कौतुक केले आहे. ते म्हणतात, की 'कुटुंबाकडे फार मोठी जमीन नाही आणि पक्के घर देखील नाही, गळणारे छप्पर असलेली विटांची खोली हेच त्यांचे घर आहे. पावसाळ्याच्या दिवसात भिंती आणि छतावरून पाणी टपकत असतानाही, पवन स्वतःची पुस्तके घेऊन बसायचा, तो नेहमी म्हणायचा, 'बाबा, मला थोडा वेळ द्या, मी सगळें बदलून टाकेल." पवन कुमार यांच्या अभ्यासासाठी कुटुंबाने ४ टक्क्यांनी कर्ज घेतले होते. एक सेकंड हँड मोबाईल खरेदी केला होता. शेतमजूर म्हणून काम करून वडिलांनी मुलाच्या स्वप्नाला पाठिंबा दिला. या अढळ विश्वास आणि पाठिंब्यामुळेच त्यांच्या मुलाने देशातील सर्वात कठीण परीक्षेत यश मिळवले. जेव्हा निकाल लागणार होता, त्या दिवशी त्यांचे वडील शेतात काम करण्यासाठी गेले होते. शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडायचे होते. पवन यांची आई सुमन देवी यांनी शिक्षणासाठी स्वतःचे दागिने विकले. तीन बहिणी देखील शेतात काम करत होत्या. गोल्डी, सृष्टी आणि सोनिका अशी पवन यांच्या बहिणींची नावे आहेत. त्या देखील शिक्षण घेत आहेत. संघर्षाच्या काळात त्यांची आर्थिक परिस्थिती इतकी कमकुवत होती, की घरातील गॅस सिलेंडरसाठी देखील त्यांच्याकडे पैसे नव्हते. त्यांची आई चुलीवर भाकरी करीत असे. त्यांच्या घरातील हापसा खराब झाल्यामुळे ते सरकारी शाळेतील नळावरून पाणी आणायचे. तरीही, कठोर परिश्रमाने पवन यांनी यश मिळवले. यश मिळवल्यानंतर पवन यांनी सांगितले, की ' चिकाटी, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती समर्पण असेल तर यश निश्चित आहे. अपयशाची भीती बाळगू नये. त्याऐवजी त्यातून शिकून पुढे जावे.

# पालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज!

## ८९ हजार ७५१ मतदारांसाठी ९७ मतदान केंद्रांचा समावेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिका निवडणुकीसाठी १८ प्रभागात ३६ जागांसाठी, तर लोकनियुक्त नगराध्यक्षपदासाठी मतदान होणार आहे. यासाठी ९७ मतदान केंद्रांवर ८९ हजार ७५१ मतदार मतदानाचा हक्क बजावतील. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार रुपेशकुमार सुराणा व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी दिली.

पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १० ऑक्टोबर पालिकेच्या सभागृहात पत्रकार परिषद झाली. यावेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री. सुराणा व श्री. शिंदे यांनी सांगितले, की अमळनेर शहरात गेल्या निवडणुकीच्या तुलनेत एक मतदान केंद्र वाढले आहे. आचार संहिता कक्ष प्रमुख म्हणून गटविकास अधिकारी एन. आर. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यंदाच्या निवडणूकीत ४५ हजार



९२८ पुरुष, ४८ हजार ८२१ महिला व इतर २ असे मतदार मतदान करतील. प्रशांत निकम यांनी दुबार मतदारांबाबत विचारणा केली श्री. शिंदे यांनी सांगितले,की पालिका कर्मचाऱ्यांमार्फत तपासणी सुरू आहे. मतदारांकडून परिशिष्ट 'अ' भरून घेतले जाणार आहे. दुबार मतदारांची मतदान यादीत नोंद केली जाणार आहे. ज्या दुबार मतदारांचा शोध लागणार नाही] त्यांच्याकडून मतदानाच्या दिवशी परिशिष्ट भरून घेतले जाईल. आदर्श आचारसंहितेचे पालन व्हावे म्हणून २४ तासांसाठी तीन एसएसटी पथक, चार एफएसटी पथक, दोन फिरते पथक असतील. सुमारे ९७ मतदान यंत्र लागतील. नगराध्यक्ष आणि नगरसेवक यांचे मतदान एकाच यंत्रावर घेण्यात येईल. उमेदवारांची संख्या जास्त झाल्यास दोन यंत्र लावण्यात येतील. यासाठी १० टक्के जास्त मतदान यंत्र उपलब्ध केले जातील. ते अद्याप प्राप्त झालेले नाहीत. उमेदवारांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच विविध परवानग्या प्राप्त करण्यासाठी पालिकेत एक खिडकी योजनेचे सात टेबल लावण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर तीन प्रभागाचे काम चाले. नगराध्यक्षपदाचे काम स्वतंत्र टेबावर असेल. मतमोजणी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी ३ डिसेंबरला आहे. उमेदवारांनी मतमोजणी प्रतिनिधी नेमण्यासाठी तीन दिवस आधीच अर्ज करावेत. नगराध्यक्षपदासाठी खर्च मर्यादा ११ लाख २५ हजार रुपये, तर नगरसेवक पदासाठी मर्यादा ३ लाख ५० हजार रुपये आहे. राखीव प्रवर्गासाठी अनामत १ हजार तर खुल्या प्रवर्गासाठी २ हजार रुपये आहे. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारचे नाव ज्या यादीत ज्या पानावर आहे त्या पानांची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षाखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले
महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# कोणत्या झाडाची पूजा केल्याने काय फायदा होतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जोतिषशास्त्रानुसार काही झाडे आणि वनस्पतींची पूजा केल्याने आपल्या कुंडलीतील दोष दूर होतात. पण जीवनातील अनेक समस्यांपासून मुक्ती मिळते. चला जाणून घेऊया कोणत्या झाडांची आणि वनस्पतींची पूजा केल्याने आपल्याला कोणते फायदे मिळतात.



### तुळशी

ज्या घरामध्ये रोज तुळशीच्या रोपाची पूजा केली जाते. त्याशिवाय देवी लक्ष्मी कुठेही जात नाही. तेथे नेहमी सुख-समृद्धी असते.



### पिंपळ

हिंदू धर्मात पिंपळ हे पूजनीय वृक्ष मानले जाते. त्याची पूजा केल्याने शनिदोषापासून मुक्ती मिळते आणि भगवान विष्णूंचा आशीर्वादही प्राप्त होतो. कडुनिंबाची पूजा केल्याने कुंडलीतील सर्व दोष दूर होतात आणि रोगांपासूनही आराम मिळतो. कुटुंबात सुख-शांती नांदते.



### वटवृक्ष

त्याला वटवृक्ष असेही म्हणतात. त्याची पूजा केल्याने महिलांचे सौभाग्य अबाधित राहते. मुलांशी संबंधित समस्याही दूर होतात. हे अतिशय पवित्र वृक्ष आहे.



### आवळा

या झाडाची पूजा केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते. पूजा करणाऱ्याला धनाशी संबंधित कोणतीही समस्या येत नाही. त्याला प्रत्येक क्षेत्रात यश मिळते.



### बिल्व

या झाडाची पाने आणि फळे भगवान शंकराला अर्पण करतात. त्याची पूजा केल्याने नोकरीत बढती आणि अकाली मृत्यूपासून संरक्षण मिळण्याची शक्यता असते.



### अशोक

त्याची आराधना केल्याने सर्व प्रकारचे रोग व दुःख दूर होऊन संसार सुखी होतो. कोणत्याही विशेष मनोकामना पूर्ण होण्यासाठीही याची पूजा केली जाते.



### केळी

ज्या लोकांच्या कुंडलीत गुरू ग्रहाशी संबंधित दोष आहेत त्यांनी या झाडाची पूजा केल्यास त्यांना लाभ होतो. तिची पूजा केल्याने विवाहही लवकर होण्याची शक्यता निर्माण होते.



### शमी

या झाडाची पूजा केल्याने शत्रूंवर विजय प्राप्त होतो. न्यायालयीन खटल्यांमध्ये यश मिळण्याची शक्यता असते. दसऱ्याला त्याची विशेष पूजा केली जाते. लाल चंदन सूर्याशी संबंधित घरातील दोष दूर करण्यासाठी लाल चंदनाच्या झाडाची पूजा योग्य रीतीने करावी. यामुळे प्रमोशन मिळण्याची शक्यताही निर्माण होते.

# वास्तुपुरुष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भगवान शिव व दानव अंधकास यांच्यामध्ये भीषण युद्ध झाले. भगवान महादेवांनी त्याला मारून टाकले. यावेळेस भगवान महादेव यांच्या जमिनीवर पडलेल्या घामाच्या थेंबातून वास्तुपुरुषाची निर्मिती झाली. उत्पन्न झाल्या-झाल्या तो भुकेने व्याकूळ झाला. कितीही भक्षण केले तरी त्याची क्षुधाशांती होत नव्हती. तेव्हा समस्त देवतांनी त्याला भूमीवर पालथे टाकले व ब्रह्मदेवाने त्याला वरदान दिले, की या पृथ्वीवर जेव्हा घराची निर्मिती होईल तेव्हा तो माणूस त्या वास्तूची पूजा करेल. वास्तूचा रक्षणकर्ता म्हणून मान देईल व नैवेद्य दाखवेल. त्यातून तुझी भूक शांत कर म्हणूनच



जी व्यक्ती रोज वास्तुपुरुषाला नैवेद्य दाखविते त्या घरात सुख-समृद्धी, शांती व उत्तम आरोग्याची प्राप्ती होते, असे वास्तुशास्त्रामध्ये मान्यता आहे. संपूर्ण पृथ्वीवर उत्तर-पूर्व ईशान्य दिशेला डोके करून व दक्षिण-पश्चिम नैर्ऋत्य दिशेला पाय करून वास्तुपुरुष पाहत झोपलेला असतो. घराच्या आग्नेय कोपऱ्यात याच पद्धतीने वास्तुपुरुष पालथा गाडला पाहिजे. या व्यतिरिक्त २४ तासांमध्ये एकदा रोज तथास्तु म्हणून वरदान देण्याची शक्ती या वास्तुपुरुषाला प्राप्त असते म्हणूनच घरामध्ये कधीही वाईट शब्द-शाप, वाणी, तळतळात व नकारात्मक बोलू नये. कोण जाणे वास्तुपुरुष कधी तथास्तु म्हणेल.

# जीवनाचे शतपथ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काशी येथील मणिकर्णिका घाटावर चिता शांत झाल्यावर मुखाग्नी देणारा व्यक्ती चितेच्या भस्मावर ९४ लिहितो. ही गोष्ट सर्वांना माहीत नसते. फक्त खरेखुरे बनारसी लोक किंवा आजूबाजूचे लोकच ही परंपरा जाणतात. बाहेरून आलेले शवदाह करणारे लोक हे जाणत नाहीत. जीवनाचे शतपथ म्हणजे १०० शुभकर्मे असतात. १०० शुभकर्म करणाऱ्या व्यक्तीला मृत्यूनंतर पुढचा जन्म त्या कर्मांच्या आधारावर शुभ किंवा अशुभ मिळतो. त्यापैकी ९४ कर्म मनुष्याच्या अधीन असतात. ती तो करू शकतो. परंतु ६ कर्मांचे फळ ब्रह्मदेवाच्या अधीन असते.

हानिलाभ, जीवनमरण, यश-अपयश ही ६ कर्मे विधीच्या नियंत्रणात असतात. म्हणून चितेसोबत तुझे ९४ कर्म भस्म झाले. आता पुढील ६ कर्मेच तुझ्यासाठी नवीन जीवनाची निर्मिती करतील. म्हणूनच १००-६=९४ असे लिहिले जाते.

गीतेतही सांगितले आहे, की मृत्यूनंतर मन पाच ज्ञानेंद्रियांना घेऊन पुढे जाते. म्हणजेच संख्या ६ होते. मन आणि पाच ज्ञानेंद्रिये. पुढचा जन्म कोणत्या देशात, कुठे आणि कोणत्या लोकांमध्ये होईल हे निसर्गाव्यतिरिक्त कोणी सांगू शकत नाही. म्हणून ९४ कर्मे भस्म होतात आणि ६ सोबत जातात.

**तुझे ६ कर्म तुझ्यासोबतच!**

आता या १०० शुभकर्मांची सविस्तर यादी दिली आहे. ही जीवनाला धर्म आणि सत्कर्मांच्या दिशेने घेऊन जाते आणि तुझ्या जीवनात सत्कर्म करण्याची प्रेरणा देईल.

**१०० शुभकर्मांची गणना**

**धर्म आणि नैतिकतेची कर्मे**

१) सत्य बोलणे
२) अहिंसा पाळणे
३) चोरी न करणे
४) लोभ टाळणे
५) क्रोधावर नियंत्रण ठेवणे
६) क्षमा करणे
७) दयाभाव ठेवणे
८) इतरांना मदत करणे
९) दान देणे (अन्न, वस्त्र, धन)
१०) गुरूची सेवा करणे
११) आई-वडिलांचा सन्मान करणे
१२) अतिथी सत्कार
१३) धर्मग्रंथांचे अध्ययन
१४) वेद आणि शास्त्रांचा अभ्यास
१५) तीर्थयात्रा करणे
१६) यज्ञ व हवन करणे
१७) मंदिरात पूजा-अर्चा करणे
१८) पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे
१९) संयम व ब्रह्मचर्याचे पालन करणे
२०) नियमित ध्यान आणि योग करणे

**सामाजिक आणि कौटुंबिक कर्मे**

२१) कुटुंबाचे पालनपोषण
२२) मुलांना चांगले शिक्षण देणे
२३) गरिबांना अन्न देणे
२४) रोग्यांची सेवा करणे
२५) अनाथांची मदत करणे
२६) वृद्धांचा सन्मान करणे
२७) समाजात शांती स्थापन करणे
२८) खोट्या वादविवादापासून दूर राहणे
२९) इतरांची निंदा न करणे
३०) सत्य आणि न्यायाचे समर्थन करणे
३१) परोपकार करणे
३२) सामाजिक कार्यात भाग घेणे
३३) पर्यावरणाचे रक्षण करणे
३४) वृक्षारोपण करणे
३५) जलसंवर्धन करणे
३६) पशुपक्ष्यांचे रक्षण करणे
३७) सामाजिक ऐक्य वाढवणे
३८) इतरांना प्रेरित करणे
३९) दुर्बल घटकांचा उत्थान करणे
४०) धर्मप्रसारात सहकार्य करणे

**आध्यात्मिक आणि वैयक्तिक कर्मे**

४१) नियमित जप करणे
४२) भगवानाचे स्मरण करणे
४३) प्राणायाम करणे
४४) आत्मचिंतन करणे
४५) मन शुद्ध ठेवणे
४६) इंद्रियांवर नियंत्रण ठेवणे
४७) लोभाचा त्याग करणे
४८) मोहमायेपासून दूर राहणे
४९) साधे जीवन जगणे
५०) स्वाध्याय करणे
५१) संतांचे सहवास घेणे
५२) सत्संगात सहभागी होणे
५३) भक्तीत लीन होणे
५४) कर्मफळ भगवानाला समर्पित करणे
५५) तृष्णेचा त्याग करणे
५६) ईर्ष्या टाळणे
५७) शांतीचा प्रसार करणे
५८) आत्मविश्वास राखणे
५९) इतरांशी उदार राहणे
६०) सकारात्मक विचार ठेवणे

**सेवा आणि दानाची कर्मे**

६१) भुकेल्यांना अन्न देणे
६२) नग्नांना वस्त्र देणे
६३) बेघरांना आसरा देणे
६४) शिक्षणासाठी दान करणे
६५) उपचारासाठी मदत करणे
६६) धार्मिक स्थळांची निर्मिती करणे
६७) गायींची सेवा करणे
६८) प्राण्यांना चारा देणे
६९) जलाशयांची स्वच्छता करणे
७०) रस्त्यांची निर्मिती करणे
७१) यात्रेकरूंकरिता निवास बांधणे
७२) शाळांना मदत करणे
७३) वाचनालय सुरू करणे
७४) धार्मिक उत्सवांत सहकार्य करणे
७५) गरिबांसाठी मोफत अन्नदान
७६) वस्त्रदान
७७) औषधदान
७८) विद्यादान
७९) कन्यादान
८०) भूमिदान

**नैतिक आणि मानवी कर्मे**

८१) विश्वासघात न करणे
८२) वचन पाळणे
८३) कर्तव्यनिष्ठ राहणे
८४) वेळेचे पालन करणे
८५) धैर्य राखणे
८६) इतरांच्या भावनांचा सन्मान करणे
८७) सत्यासाठी संघर्ष करणे
८८) अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे
८९) दुःखितांचे अश्रू पुसणे
९०) मुलांना नैतिक शिक्षण देणे
९१) निसर्गाबद्दल कृतज्ञता ठेवणे
९२) इतरांना प्रोत्साहन देणे
९३) मनवचनकर्म शुद्ध ठेवणे
९४) जीवनात संतुलन राखणे

**विधीच्या अधीन असलेली ६ कर्मे**

९५) हानी
९६) लाभ
९७) जीवन
९५) मरण
९९) यश
१००) अपयश

९४ कर्मे मनुष्याच्या अधीन वरील यादीतील १ ते ९४ पर्यंतची कर्मे मनुष्य स्वतःच्या विवेक, इच्छाशक्ती आणि प्रयत्नांद्वारे करू शकतो. ही धर्म, सत्य आणि नैतिकतेवर आधारित असून जीवनाला सार्थक बनवतात.

६ कर्मे विधीच्या अधीन शेवटची ६ कर्मे (हानी, लाभ, जीवन, मरण, यश, अपयश) मनुष्याच्या नियंत्रणाबाहेर आहेत. ती भाग्य, निसर्ग किंवा परमेश्वराच्या इच्छेनुसार घडतात.

# एकाग्रता वाढविण्यासाठी भारतीयांच्या सहा प्राचीन सवयी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या तणावपूर्ण जगात मन शांत ठेवण्यासाठी, एकाग्र ठेवण्यासाठी वेगवेगळे उपाय सुचविले जातात. काही लोक तर औषधे घ्यायला सांगतात. परंतु भारतीयांच्या काही प्राचीन सवयी, ध्यान व प्राणायाम तुम्हाला शांत राहण्यासाठी व एकाग्रता वाढविण्यासाठी मदत करतील.

स्पष्टता मिळविण्यासाठी आपल्याला नवीन कोणते तरी उत्पादकतेचे तंत्र शिकण्याची आवश्यकता नाही, असे योग शिक्षक सांगतात. त्यांचा विश्वास आहे, की आपल्याला केवळ शांती हवी आहे. त्यापेक्षा फार काही अपेक्षा नाही. मात्र या शांतीसाठी ते आपल्याला प्राचीन सवयी आपल्या रोजच्या जीवनात समाविष्ट करण्याचा सल्ला देतात. ज्यामुळे आपली एकाग्रता वाढते. ते म्हणतात, की आपले पूर्वज रोजच्या जीवनात ध्यान आणि मनाचे पोषण करण्यासाठी विविध सवयींचा अवलंब करायचे.



### त्राटक ध्यान

हे एक प्राचीन योगिक तंत्र आहे. ज्यामध्ये आपल्याला एका मेणबत्तीच्या जळणाऱ्या ज्योतीकडे बघायचे असते. डोळ्यांच्या पापण्या मिटायच्या नाहीत. यामुळे दृश्य एकाग्रता वाढते आणि मन शांत होते. फक्त ५ मिनिटे दररोज याचा सराव केल्याने मानसिक स्पष्टता वाढू शकते.

### नसाग्र दृष्टी

हे एक प्राचीन तंत्र आहे. ज्याचा उपयोग एकाग्रता वाढविण्यासाठी केला जातो. यामध्ये विशिष्ट योगासने आणि ध्यानामध्ये आपल्या नाकाच्या टोकाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असते. हे तंत्र आपल्या विचारांना केंद्रित करण्यास मदत करते.

### नाडी शोधन

हे श्वासोच्छ्वासाचे तंत्र आहे. जो डाव्या आणि उजव्या मेंदूचे संतुलन साधतो. ऊर्जा वाहिन्या स्वच्छ करतो. आपल्याला एकाच वेळी शांत तरीही जागरूक ठेवतो. हे तंत्र कामापूर्वी किंवा अध्ययनाच्या आधी वापरणे योग्य असते.

### ब्रह्मारी प्राणायाम

या तंत्रात मृदू आवाजात श्वास घेतला जातो. ज्यामुळे मानसिक गोंधळ कमी होतो. उच्च एकाग्रता आवश्यक असलेल्या कामांच्या आधी याचा अभ्यास करणे फायदेशीर ठरते.

### मंत्रोच्चार

'ॐ' किंवा 'सो-हम' यांसारख्या मंत्रांचा नियमित उच्चार केल्याने आपले मन स्थिर राहते. अगदी आपल्या विचारांना स्थिरता मिळते.

### योगासने

वृक्षासन आणि गरुडासन यांसारखी स्थिरता आणि संतुलन आवश्यक असलेली योगासने एकाग्रता सुधारतात. योगतज्ज्ञांचे म्हणणे आहे, की या आसनांचा अभ्यास करताना आपण फोकस होतो. आपली एकाग्रता वाढते.

### अनवाणी पायाने गवतावर चालणे

पायात चप्पल, बूट न घालता अनवाणी पायाने गवतावर चालणे हे देखील संतुलनासाठी चांगले तंत्र मानले जाते. यामुळे नर्व्हस सिस्टीम संतुलित होते. आपला मूड सुधारतो. मानसिक गोंधळ कमी होतो.



# सोमवारचा राशीनुसार मंत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवारच्या दिवशी राशीनुसार मंत्रांचा जप केल्याने भगवान महादेव प्रसन्न होतात.
**मेष** राशीसाठी '**॥ॐ नमः शिवाय॥**',
**वृषभ** राशीसाठी '**॥ॐ रुद्रनाथ नमः॥**' आणि
**मिथुन** राशीसाठी '**॥ॐ उमापति नमः॥**' हे मंत्र आहेत. प्रत्येक राशीनुसार मंत्रांची माहिती खाली दिली आहे.

**राशीनुसार सोमवारचे मंत्र**

**मेष राशीः** '॥ॐ नमः शिवाय॥' (या राशीच्या लोकांनी सोमवारी या मंत्राचा जप करावा).
**वृषभ राशीः** '॥ॐ रुद्रनाथ नमः॥' किंवा '॥ॐ नागराय नमः॥'. **मिथुन राशीः** '॥ॐ उमापति नमः॥'.
**कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनू, मकर, कुंभ व मीन** या राशीच्या लोकांनी **:** '॥ॐ नमः शिवाय॥' (या मंत्राचा जप करावा).

